# महाराष्ट्र शासन

क्र. मअसे/प्राअप्रपा-५६/२०१६/७५५३

महाराष्ट्र अग्निशमन सेवा संचालनालय
राज्य अग्निशमन प्रशिक्षण केंद्र,
विद्यानगरी, हंस भुग्रा मार्ग,
सांताक्रुझ (पूर्व),
मुंबई-४०० ०९८

दूरध्वनी क्र.०२२-२६६७ ७५५५
फॅक्स क्र. ०२२-२६६६ ०२८७

दिनांक : ०३.१०.२०१६

प्रति,

आयुक्त / मुख्याधिकारी,
सर्व महानगरपालिका / नगरपालिका,
इतर अग्निशमन सेवांचे प्रमुख.

विषय : महाराष्ट्र अग्निशमन सेवा अकादमी, मुंबई
प्राथमिक अग्निशमन प्रशिक्षण पाठयक्रम

**महोदय,**

महानगरपालिका/नगरपरिषदा, शासकीय उपक्रमे यांच्या अग्निशमन सेवेतील पुरस्कृत कर्मचा-यांसाठी प्रशिक्षण पाठयक्रम आयोजित करण्यांत येणार असून त्याचा तपशील पुढीलप्रमाणे आहे.

| | | | |
|---|---|---|---|
| ०१. | पाठयक्रमाचे नांव | : | प्राथमिक अग्निशमन प्रशिक्षण पाठयक्रम क्र.५६ |
| ०२. | कालावधी | : | दि.०६.०१.२०१६ ते ०५.०४.२०१६ (१४ आठवडे ) |
| ०३. | जागांची संख्या | : | प्रत्येक पाठयक्रमासाठी ३० |
| ०४. | वयोमर्यादा | : | महानगरपालिका/शासकीय उपक्रमे येतील कर्मचारी १८ ते ४५ वर्षे, इतर खाजगी कंपन्यातील कर्मचारी १८ ते ३५ वर्षे (पाठयक्रम सुरु होण्याच्या दिवशी). |
| **०५.** | **शारीरिक व शैक्षणिक पात्रता** | : | राज्यातील महानगरपालिका / नगरपालिका यांच्या अग्निशमन सेवेतील कर्मचा-यांच्या प्राथमिक अग्निशमन पाठयक्रम प्रवेशासाठी कर्मचारी अग्निशमन दलातील सेवेत कायम झाले असावेत किंवा ज्यांची सेवा अग्निशमन सेवेत कायम होणार आहेत किंवा ५ वर्षे पूर्ण झाली आहेत अशा कर्मचा-यांसाठी उंची, वजन व छाती या अटी शिथिल करण्यांत येत आहेत.<br><br>तसेच आपण शिफारस करणा-या उमेदवाराची जर सन २००५ नंतर इतर विभागातून अग्निशमन विभागात नेमणूक झाली असेल तर त्या उमेदवाराची शैक्षणिक पात्रता किमान १० वी उत्तीर्ण असणे आवश्यक आहे. शारीरिक पात्रता नगरपालिका प्रशासन |

**संचालनालयाचे स्थायी आदेश क्र.३१ क्र.नपस/ अग्निशमन सेवा/२००५/प्र.क.३१४/९, दि.२५.०४.२००५ च्या परिशिष्ट ब नुसार असणे आवश्यक आहे.** जर उमेदवार नमूद केलेली शारीरिक पात्रता धारण करीत नसल्यास अशा उमेदवाराचा प्रवेश नाकारण्यांत येईल याची नोंद घ्यावी.

प्रमाणपत्र पडताळणीचे वेळी पुरावा म्हणून लेखी दस्ताऐवज असणे आवश्यक आहे. तथापि वैद्यकीय दृष्टया तो कर्मचारी पात्र आहे किंवा कसे याबाबत सोबतच्या नमुन्यानुसार वैद्यकीय अधिका-यांचे प्रमाणपत्र अर्जासोबत पाठविणे आवश्यक आहे.

| | | | |
|---|---|---|---|
| ०६. | प्रशिक्षणाचे ठिकाण | : | प्रशिक्षणाचे ठिकाण नंतर कळविण्यांत येईल. |
| ०७. | प्रवेश अर्ज फी | : | प्रवेश अर्ज फी म्हणून मागासवर्गीय उमेदवाराने (अनु.जाती/अनु.जमाती ) रु.१००/- व इतरांनी रु.१५०/-चा डिमांड ड्राफट **"FIRE ADVISER TO THE GOVERNMENT OF MAHARASHTRA, MUMBAI"** यांचे नांवे काढून अर्जासोबत पाठवावा. |
| ०८. | प्रशिक्षण शुल्क | : | १. महानगरपालिका/, शासकीय कर्मचारी यांचे कर्मचा-यांसाठी रु.१५०/- प्रति आठवडा) एकूण १४ आठवडे<br>२.नगरपालिका /नगरपंचायती यांचे कर्मचा-यांसाठी रु.१००/- प्रति आठवडा) एकूण १४ आठवडे<br>**(ज्या महानगरपालिका/नगरपालिका या प्रशिक्षण केंद्रास वार्षिक अनुदान देत नाहीत, त्यांचेकडून दुप्पट दराने प्रशिक्षण शुल्क आकारण्यांत येईल).**<br>३. शासकीय उपक्रमे रु.२००/- प्रति आठवडा) एकूण १४ आठवडे |
| ०९. | प्रमाणपत्र व गुणपत्रिका शुल्क | : | रु.३००/- |
| १०. | अनामत रक्कम | : | या अकादमतील प्रशिक्षणार्थ्यांच्या विविध सुविधांसाठी प्रत्येक प्रशिक्षणार्थ्यांस प्रत्येकी रु.१०००/- ॲमेनिटी फंड भरावा लागेल. |
| ११. | सेवा शुल्क | : | रु.१४०/- ( प्रति व्यक्ति प्रति आठवडा एकूण १४ आठवडे ) |

१२. भोजन खर्च द.म.(अंदाजे) : रु.४,०००/- ते ४,५००/- (प्रशिक्षणार्थ्यांनी स्वतः करावयाचा आहे)

१३ प्रशिक्षण साहित्य (अंदाजे ) : रु.६,०००/- ते रु.७,०००/-(प्रशिक्षणार्थ्यांनी स्वतः करावयाचा आहे)

**सूचना : फक्त प्रवेश अर्ज फी पाठयक्रम प्रवेश अर्जासोबत पाठविण्यांत यावी. प्रशिक्षण फी, सेवा शुल्क, ॲमिनिटी फंड इत्यादी बाबत या कार्यालयाकडून पाठयक्रम प्रवेशाच्या पत्रामध्ये कळविण्यांत येईल.**

१४. अर्जासोबत जोडावयाची साक्षांकीत प्रमाणपत्रे

१. शाळेचा दाखला किंवा १० वी चे बोर्ड प्रमाणपत्र
२. शैक्षणिक पात्रतेची प्रमाणपत्रे
३. तांत्रिक शिक्षण्ांची पमाणपत्रे असल्यास
४. जातीचे प्रमाणपत्र
५. सेवेत नियुक्त झालेल्या आदेशाची प्रत
६. ओळखपत्राची प्रत

०२. या अकादमीकडून आपल्या आस्थापनेवरील उमेदवारांना पाठयक्रमात सहभागी करुन घेणार आहे किंवा कसे याबाबत लेखी पत्र प्राप्त झाल्याशिवाय आपण कर्मचा-यांना कार्यमुक्त करु नये. पाठयक्रमात सहभागी होण्यासाठी क्षमतेपेक्षा अधिक उमेदवार उपलब्ध झाल्यास काही उमेदवारांना पुढील पाठयक्रमात सामावून घेतले जाईल. याबाबत आपणांस स्वतंत्रपणे कळविण्यांत येईल. तरी आपल्या अग्निशमन सेवेतील **कर्मचा-यांचे प्रवेश अर्ज विहित नमुन्यात आवश्यक त्या कागदपत्रांसह या कार्यालयात दि.३०.११.२०१५ पर्यंत पाठवावेत.**

आपला विश्वासू,

**(एम.व्ही.देशमुख)**
अग्निशमन सल्लागार
महाराष्ट्र शासन.

सहपत्र : प्रवेश अर्ज व सूचनापत्र.

*अलीकडील पासपोर्ट आकाराचा रंगीत फोटो चिटकून साक्षांकीत करावे. (शिफारस करणा-या प्राधिका-याची सही व शिक्यासह*

# *महाराष्ट्र शासन*

**अग्निशमन सल्लागार यांचे कार्यालय,**
**राज्य अग्निशमन प्रशिक्षण केंद्र,**
सांताक्रुझ ( पूर्व ) मुंबई ४०० ०९८

## प्र वे श अ र्ज

०१. पाठयक्रमाचे नांव : प्राथमिक अग्निशमन प्रशिक्षण पाठयक्रम क्र.५६
कालावधी दि.०६.०१.२०१६ ते ०५.०४.२०१६

०२. शिफारस करणा-या प्राधिका-याचे नांव
(इंग्रजी):

(मराठी):

०३. उमेदवाराचे संपूर्ण नांव (इंग्रजी):

(मराठी):

०४. अग्निशमन दलातील हुद्दा :

०५. जन्मतारीख :

०६. पत्रव्यवहाराचा पत्ता :

०७. दूरध्वनी क्रमांक :

०८. कायमचा पत्ता :

०९ आपण अनुसूचित जाती/जमातीचे आहात काय ? असल्यास प्रमाणपत्राची साक्षांकित प्रत जोडावी. : जात ------------ वर्ग ----------

१० शारिरीक पात्रता : (अ) उंची : ---------- सें.मी.

(ब) वजन : --------- कि .ग्रॅ.

(क) छाती : ---------सें.मी. (सर्वसाधारण)

: --------- सें.मी. (फूगवून)

११ शैक्षणिक पात्रता

| उत्तीर्ण झालेल्या परिक्षेचे नांव | उत्तीर्ण होण्याचे वर्ष | संस्थचे नांव | श्रेणी | विषय |
|---|---|---|---|---|
| | | | | |

१२. यशस्वीरित्या पूर्ण केलेल्या तांत्रिक पाठयक्रमाचा तपशील

| उत्तीर्ण झालेल्या परिक्षेचे नांव | उत्तीर्ण होण्याचे वर्ष | संस्थचे नांव | श्रेणी | विषय |
|---|---|---|---|---|
| | | | | |

(येथे अग्निशमन संस्था अथवा अगिनशमन प्रशिक्षण पूर्ण केलेल्या पाठयक्रमाचा अंतर्भात असावा)

१३. सेवेत धारण केलेल्या विविध दर्जा/पदांचा तपशिल
(संबंधित कार्यालयाने माहिती नमूद करावी)

| नेमणूक करणा-या कार्यालयाच्या प्रमुखांचे नांव व पत्ता | अर्जदाराने धारण केलेले पद/दर्जा | सेवाकाळ | | अग्निशमन सेवेत रुजू झाल्याची तारीख | पद सोडण्याचे कारण |
|---|---|---|---|---|---|
| | | पासून | पर्यंत | | |
| | | | | | |

(येथे सेवा प्रवेशापासून आतापर्यंत धारण केलेल्या सर्व पदांचा तपशिल द्यावा)

१४. आपण मोटारवाहन चालविण्याचा परवाना धारण करीत असल्यास त्याचा तपशील द्यावा. : अ) परवाना क्रमांक

ब) जड / हलके

१५. क्रीडा प्राविण्याबददल माहिती व कागदपत्रे :

१६. यापूर्वी आपणांस कोणत्याही कारणास्तव पाठयक्रमात प्रवेश नाकारण्यांत आला आहे काय ?
असल्यास तपशील द्यावा.

१७. न्यायालयामार्फत आपणांस शिक्षा झाली आहे काय ? अथवा पोलिस ठाण्यावर आपणांविरुध्द गुन्हा प्रलंबित आहे काय ? :
असल्यास तपशील द्यावा.

१७. आपल्या प्रशिक्षणाचा खर्च कोण करणार आहे ?

१८. प्रवेश अर्जासोबत जोडलेली कागदपत्रे :

## उमेदवाराचे घोषणापत्र

सदर पाठयक्रमासंबंधी पान क. ०५ वरील सर्व नियम मी वाचले असून त्यास माझी मान्यता आहे व त्या अटी/ नियमानुसार मी वागण्याचे मी मान्य करतो.

पाठयक्रमाच्या कालावधीत प्रशिक्षणार्थ्यांना फायर कॉल अ‍ॅटेन्ड करावे लागतील त्यामुळे फायर कॉलवर गेल्यावर प्रशिक्षणार्थ्यांची स्वतःची काळजी ही त्यांची जबाबदारी असेल यासह प्रशिक्षण कालावधीत कोणत्याही प्रकारची इजा, जखम, नुकसान, विकलांगता अथवा मत्यू झाल्यास राज्य अग्निशमन प्रशिक्षण केंद्र, मुंबई जबाबदार राहणार नाही.

प्रवेश अर्जात वर नमूद केलेली सर्व माहिती सत्य असल्याचे मी घोषित करतो.

मी सर्व प्रकारे वैद्यकीयदृष्टया स्वस्थ असून अशा कोणत्याही रोगापासून पिडीत नाही की, ज्यामुळे मी अतिशय कष्टकरी प्रशिक्षण घेऊ शकणार नाही.

ठिकाण :
दिनांक :

अर्जदाराची सही

---

## शिफारस करणा-या प्राधिका-याचे प्रमाणपत्र

वरील घोषणापत्र ______________________________ यांनी माझ्या समक्ष सही केली आहे.

अर्जात नमूद केलेली माहिती कार्यालयीन दस्ताऐवजानुसार पडताळून पाहिली आहे. तसेच सदर माहिती सत्य आहे.

तसेच सदरचे अर्जदार नियमितरित्या नियुक्त कर्मचारी असून त्यांची नेमणूक रोजंदारी / हंगामी /कॉन्ट्रक्टवर नाहीत हे मी स्वतः पडताळून पाहिले आहे व प्रमाणित करतो आहे.

शिफारस करणा-या प्राधिका-याचे नांव व
पदनांम शिक्का व सही

## वैद्यकीय स्वास्थ प्रमाणपत्र

(पुरस्कृत संस्थेच्या वैदयकीय अधिका-यांकडून )

(अ) पाठयक्रमाचे नांव व कालावधी : प्राथमिक अग्निशमन प्रशिक्षण पाठयक्रम क्र.५६
दि.०६.०१.२०१६ ते दि.०५.०४.२०१६

(ब) शिफारस करणा-या प्राधिकरणाचे नांव :
महानगरपालिका/नगरपालिका इ.

(क) अर्जदाराची सही :

१. प्रमाणित करण्यांत येत आहे की, वर सही करणारे श्री. ---------------------------------------------- यांना तपासले असून ते सर्व प्रकारे प्रशिक्षणासाठी संसर्गजन्य रोग, क्षयरोग, ह्रदयरोग, फुफ्फुसरोग, दमा, अपेंडिक्स, किडनी, रक्तदाब यापासून त्यांना स्वास्थ्य आहे. तसेच त्यांची दृष्टी चांगली आहे.

२. मी आणखी प्रमाणित करतो की. वरील प्रशिक्षणार्थी शिडीचे व अन्य ड्रिल, साधनसामुग्री इ. हाताळण्याचा सराव व उंचीवरील विमोचन कार्य चष्म्याशिवाय करु शकतील. तसेच ते शारिरीकदृष्टया अग्निशमन प्रशिक्षणासाठी पात्र आहेत.

३. मी आणखी प्रमाणित करतो की. वरील प्रशिक्षणार्थी यांना चष्मा असला तरी ते शिडीचे व अन्य ड्रिल, साधनसामुग्री इ. हाताळण्याचा सराव व उंचीवरील विमोचन कार्य चष्म्याशिवाय करु शकतील. तसेच ते शारिरीकदृष्टया अग्निशमन प्रशिक्षणासाठी पात्र आहेत.

४. प्रमाणित करण्यांत येत आहे की, श्री ---------------------------------------------- यांची शारिरीकदृष्टया पात्रता पुढीलप्रमाणे आहे.

शारिरीक पात्रता : (अ) उंची : ---------- सें.मी.

(ब) वजन : --------- कि .ग्रॅ

(क) छाती : --------- सें.मी. (सर्वसाधारण)

: --------- सें.मी. (फूगवून)

५. माझ्या मते त्यांचे अंदाजे वय --------- वर्षे आहे.

ठिकाण :

दिनांक :

सही : -------------------------------

पदनाम :----------------------------

नोंदणी क्र.:-------------------------

सील : ----------------------

# महाराष्ट्र अग्निशमन सेवा अकादमी, मुंबई

## पाठयक्रमात प्रवेश घेणा-या प्रशिक्षणार्थ्यांसाठी प्रशिक्षणबाबत सूचना व नियम

०१. प्रशिक्षणार्थ्यांना या अकादमीमध्ये राहणे सक्तीचे आहे. पाठयक्रम निवासी असल्यामुळे उमेदवारांना निवासव्यवस्था व अन्य शुल्क पाठयक्रम सुरु होतेवेळीस भरावा लागेल. तसेच निवासस्थानाबाबत सर्व सोयी उपलब्ध नसल्यामुळे प्रशिक्षणार्थ्यांना आपल्या सामानासोबत झोपण्यासाठी आवश्यक सतरंजी, चादर आणणे आवश्यक आहे.

०२. अकादमीतील भोजन व्यवस्थेचा अवलंब करणे सक्तीचे आहे. प्रशिक्षणार्थ्यांच्या भोजनाची व्यवस्था प्रशिक्षणार्थ्यांनी स्वयंपाकीच्या मदतीने सहकारी तत्वाने कार्यान्वित करावयाची आहे. त्यासाठी दरमहा रु ४०००/- ते ४,५००/- सरासरी भरावे लागतील.

०३. प्रशिक्षणार्थींनी दोन सेटस व्हाईट हाफ पॅन्टस, दोन व्हाईट हाफ टी शर्ट, व्हाईट कॅनव्हास शुज, व्हाईट सॉक्स, व्हाईट वेबबेल्ट, गमबूट, डांगरी निळी कलर, निळी फुलपॅन्ट व स्काय ब्लू शर्ट (पॉकेटस व शोल्डर स्ट्रीपसह) २ जोड, १ बेरेट कॅप (निळी कलर ), ऑक्सफर्ड ब्लॅक लेदर शूज, लाईन यार्ड विथ व्हिसल (निळी कलर), गमबूट, नेम प्लेट (इंग्रजी व मराठी ) इत्यादी सरावासाठी प्रशिक्षणार्थींनी आणणे आवश्यक आहे. फायरमन ॲक्स, हेल्मेट या दोन वस्तू केंद्रातर्फे प्रशिक्षणार्थींना प्रशिक्षण कालावधीपुरते पुरविले जातील. ट्रेनिंग किटसाठी अंदाजे रु.६०००/- खर्च अपेक्षित आहे.

०४. दर महिन्यास लेखी परिक्षा घेण्यांत येईल. उत्तीर्ण होण्यासाठी किमान ४० टक्के गुण आवश्यक आहेत. प्रशिक्षणाच्या अखेरीस लेखी/सरावाची (प्रॅक्टीकल) परिक्षा घेण्यांत येईल व उत्तीर्ण होण्यासाठी किमान ६० टक्के गुणांची आवश्यकता आहे. अंतिम लेखी परिक्षेच्या गुणपत्रिका व प्रमाणपत्रासाठी रु.३००/- शुल्क आकारले जातील. प्रमाणपत्रांवर गुणांनुसार श्रेणी दिल्या जातील.

०५. जे प्रशिक्षणार्थी सर्व परिक्षा यशस्वीरित्या उत्तीर्ण होतील त्यांना उत्तीर्ण झाल्याबाबत प्रमाणपत्र देण्यांत येईल. जे प्रशिक्षणार्थी परिक्षेत उत्तीर्ण होणार नाहीत, त्यांना पुढील सत्राच्या परिक्षेला पुन्हा बसावे लागेल. सर्व साधारण पुढील सत्राच्या परिक्षेसाठी उमेदवारांनी केंद्राच्या संपर्कात राहणे ही संबंधितांची जबाबदारी असेल. अनुत्तीर्ण झाल्यानंतर पुन्हा परिक्षेस बसण्याची संधी दोन वेळा आहे.

०६. प्रशिक्षण काळात प्रशिक्षणार्थींना केंद्राची स्वच्छता, परिरक्षण, बागकाम, साधनसामुग्री इ. चे परिरक्षण वगैरे सर्व प्रकारची कामे करावी लागतील व पाठयक्रमाच्या कालावधीत सर्व नियमांचे व शिस्तीचे पालन करणे आवश्यक आहे. केंद्रात संपूर्ण पाठयक्रम दरम्यान शिस्तीला जास्त प्राधान्य असल्यामुळे शिस्त वर्तनाबददल केंद्रातून केव्हाही काढून टाकण्यांत येईल.

०७ शासकीय सुटटयांच्या दिवशी प्रशिक्षण बंद राहील. विहित केल्याशिवाय रजा मिळणार नाही. परंतू प्रशिक्षणार्थ्यांना प्रशिक्षणाचा एक भाग म्हणून प्रशिक्षण कालावधीत सार्वजनिक सुटटीच्या दिवशी व इतर कोणत्याही दिवशी व वेळी आळीपाळीने सुरक्षेचे (सिक्युरिटीचे) किंवा अन्य या व्यतिरिक्त कर्तव्ये सुपूर्द करण्यांत येतील, त्याबददल कोणत्याही प्रकारचे वेतन/मोबदला/बदली रजा अनुज्ञेय नसेल तसेच त्यांना फायर कॉलवर जावे लागेल. पुर्वसूचनेशिवाय प्रशिक्षण केंद्रातून प्रशिक्षणार्थी गैरहजर राहिल्यास त्याचे प्रशिक्षण खंडीत करण्यांत येईल. कार्यमुक्त केल्यास प्रशिक्षणार्थ्याच्या तो पर्यत दिलेल्या प्रशिक्षण कालावधीच्या अनुरुप, केंद्राच्या सूचनेनुसार/ नियमानुसार प्रशासन व अन्य खर्चासाठी रकमेतून कपात करण्यांत येईल. अशा प्रकारे कपात केली जाणारी रक्कम, प्रवेश शुल्क संबंधित प्रशिक्षणार्थ्यांकडून पुरस्कृत करणा-या संस्थेने वसूल करावी व अन्य प्रकारे अनुज्ञेय खाते निहाय कार्यवाही करावी.

**०८. प्रशिक्षण कालावधीत मोबाईल वापरण्यांस पूर्णपणे बंदी असून असे जर निदर्शनास आले तर त्याचे नांव प्रशिक्षण सत्रातून कमी करण्यांत येईल याची नोंद घ्यावी.**

०९. पाठयक्रमासंबंधी आणखी नियम व अटी केंद्राच्या सूचना फलकावर लावण्यांत आलेल्या असतात, त्याचे अवलोकन करणे आवश्यक आहे.

...............................................................